नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 05/06/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील एम टी डी सी रोड वरील टर्निंग अंबाळा रामटेक येथे दिनांक 04/06/2021 चे 17:00 वा. ते 17.30 वा. दरम्यान श्यामल चिंधुजी उईके वय 26 वर्षे रा. भेंडाळा व त्याचा मित्र निहार श्रावण सरोते वय 25 वर्षे रा. शिरपुर हे दोघेही एमएच–40/8179 क्रमांकाच्या बजाज डिस्कव्हर मोटर सायकलने रामटेक कडुन शिरपुर कडे जात होते. त्यादरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने अंबाळा एमटीडीसी जवळ वळन रस्त्याजवळ एमएच–40/8179 क्रमांकाच्या बजाज डिस्कव्हर मोटरसायकला धडक दिली. या अपघातात ते खाली पडल्याने श्यामल उईके हा मरण पावला व निहार सरोते हा जखमी असुन उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अमोल चिंधुजी उईके वय 31 वर्ष, रा. भंडाळा ता. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि मिना बारंगे मो.न. 9527475217 या करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 3 कि मी अंतरावर सालई (बु) येथे दिनांक 22/05/2020 ते दिनांक 04/05/2021 दरम्यान फिर्यादी नामे– महेन्द गोपाळराव मोडक, वय 59 वर्षे, रा. गिरीश हाईट, कामठी रोड नागपूर यांचे मालकीचे मौजा सालई (बु) येथील शेती आरोपी नामे 1) शकीलाबी शेख मेहमुद शेख रा. शनीचरापेठ कोंढाळी ता. काटोल, जि. नागपुर हिने आपल्या इतर साथीदारांच्या मदतीने संगनमत करून शेती दुसऱ्याला विक्री करून फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 420, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप इंगळे मोक्र 9011119522 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 27 कि. मी. अंतरावरील वराडा येथे दिनांक 12/05/2021 चे 21.30 वा. दरम्यान सौ. संगिता आशीष उईके (मृतक), वय 27 वर्ष, रा. वराडा हि घरी चुलीवर स्वयंपाक करीत असतांना अचानक तिचे साडीचा पदर चुलीवर पडुन अंगवरील कपडयांना पेट लागुन ती 54 टक्के जळाली. तिला उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय रामटेक व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर नेले असता दि. 03/06/2021 चे 04.00 वा. तिचा मृत्यु झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि सतिश मेश्राम पो.स्टे. कन्हान 90671 76694 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर